“मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सामाजिक शास्त्र

विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर

करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा (Synopsis)

संशोधक

अंबादास नरसिंगराव पाचंगे

एम.ए. नेट (राज्यशास्त्र)

मु.पो. देवणी (बु.), ता. देवणी जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. संजय मारोतीराव कोनाळे

सहाय्यक प्राध्यापक,

राज्यशास्त्र विभाग

शिवाजी महाविद्यालय, उदगीर ता. उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड जि. नांदेड.

जुलै २०२२

१) प्रस्तावना :-

भारतीय समाज असा शब्द उच्चार करताच डोळ्यासमारे चित्र उभे राहते ते म्हणजे वेगवेगळे वस्त्र परिधान करून वेगवेगळ्या प्रथा- परंपरे प्रमानेच आपल्या प्रचीन संस्कृतीचे जतन करणारा समुदाय दिसुन येतो. असा हा भारतीय समाजात हा अनेक जाती-पोट जाती यासह अनेक वेगवेगळ्या पंथाचा, अनेक धर्मांचा, अनेक परंपराचा एक समुदाय आहे. या देशातील प्रत्येक धर्म हा वेगळा आहे, त्याची शिकवण रुढी, प्रथा परंपरा वेगळ्या आहेत त्याच प्रमाणे प्रत्येक जाती व पोटजातीच्या रुढी, प्रथा परंपरा ह्या वेगवेगळ्याच आहेत. प्रत्येक जातीतील व्यक्ती स्वातः ची जात ही इतर जातीपेक्षा वरची असल्याचे नेहमीच सांगतो, त्यामुळे त्यांच्यात एकता किंवा सामाजिक समानता केव्हाही प्रस्थापीत होऊ शकली नाही.

भारतीय समाजातील हिंदू धर्मामध्ये वर्ण व्यवस्था आस्थित्वात होती, त्यात ब्राम्हण, क्षत्रीय, वैश आणि शुद्ध अशी कप्पेबंध उत्तरंड आस्तिवात होती. यात एका वर्णातील व्यक्तीला दुसऱ्या वर्णात प्रवेश करण्यासाठी कसल्याही प्रकारचा दरवाजा किंवा सिडी नावाची गोष्ट अस्तित्वात नव्हती. त्यामुळे ब्राम्हाण वरच्या कप्प्यात तर इतर वर्ण खालव्या कप्प्यात क्रमबद्ध रितीने अनेक वेगवेगळ्या जाती - उपजातीमध्ये विभागलेला प्रचंड मोठा जातींचा समुदाय भारतीय समाजात आजही अस्तित्वात आहे.

मनुष्य हा समाजशिल प्राणी असल्यामुळे एका मणुष्याला दुसऱ्या मनुष्यावर नेहमीच आवलंबुन राहावे लागते आणि यातुनच बारा बलुतेदार आणि आठरा आलुतेदार ही गोष्ट जन्माला आली. आणि त्यातुनच आनेक जातीची निर्मिती झाली यात अनेक स्पृश्य व अस्पृश्य जातींचा समावेश आहे. या सर्वांचा मिळून 'गावगाडा' तयार झाला.

परंतु या सर्वांपेक्षाही एक वेगळ्या जाती जमातींचा वर्ग अस्त्विात आहे, तो कायम जंगलात किंवा कायम गावात न राहणारा असा त्यांचा गट आहे. गावकुसाबाहेर राहुन गावातील आधारावर, दयेवर आणि आपल्या अंगच्या विविध कलागुणावर तो गावच्या आश्रयाला आनाधी काळापासुन जगत आलेला वर्ग म्हणजे भटके विमुक्त जाती-जमाती होय. हा वर्ग गावापासून दूर असल्यामुळे आजही दूरच राहिलेला आहे आणि व्यावस्थेनेही त्यांना जवळ करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केव्हाही केलेला नाही.

२) भटक्या जमाती या संकल्पनेचा अर्थ :

भारतात प्राचीन काळापासूनच आस्तीत्वात असलेला एक समुदाय म्हणजे भटक्या जमाती होय. प्राचीन काळापासूनच हा समुदाय गावगाडयासोबत सबंध ठेवून आहे.

उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अगर वाट्यास आलेल्या व्यवसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या लोकांना भटके म्हणतात. इंग्रजीत त्यांचा उल्लेख 'नोमॅड्स' असा करतात. नोमॅड हा शब्द 'नोमी' किंवा 'नेमो' (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. स्वतःचे कायम स्वरुपाचे घर किंवा शेतजमीन नाही; परंतु गुरांचे कळप आहेत, असे लोक गुरांसाठी चराऊ कुरणांच्या शोधार्थ सतत भटकत असतात, अशा लोकांना उद्देशून नोमॅड हा शब्द वापरला जातो. हा शब्द किंवा संकल्पना फक्त

जंगलात भटकणाऱ्या लोकांसाठीच वापरली जात नाही, तर एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकंती करणाऱ्या लोकांसाठीही ती वापरली जाते. खेचरे, गाढवे, तट्टू, घोडे, उंट इत्यादींवर आपली मालमत्ता लादून स्वतःच्या इच्छेनुसार किंवा परिस्थितीच्या दडपणामुळे चांगली उपजीविका होऊ शकेल, अशा ठिकाणांच्या शोधात असे लोक सतत स्थलांतर करीत रहातात, डोंबारऱ्याचे खेळ, जादुचे खेळ, भविष्य कथन, किरकोळ व्यापार, कारागिरी, वैद्यकी इ. व्यवसाय ते करतात. सतत भटकणाऱ्या समूहांव्यतिरिक्त काही समूह हे अर्ध-भटके जीवन जगतात. अशा समूहांजवळ स्वतःचे घर किंवा थोडीफार शेतजमीन असते आणि शेतीचा हंगाम संपल्यानंतर जेथे उदरनिर्वाहाकरिता लागवडीला योग्य अशी जमीन उपलब्ध असेल, तेथे कुटुंबियांसह आणि सामानासह ते स्थलांतर करतात, हंगाम संपल्यानंतर ते आपल्या मूळ ठिकाणी येतात.

प्राचीन काळी भटक्यातील अनेक जाती गावगाड्याला आपली विद्या कसब, किवा मेहनत कुणब्याच्या कुनबिकीला अथवा सरकारी कामाला मदत करत असत, त्यांना कारू म्हणत, तर ज्यांची मदत क्वचित प्रसंगीच लागे किवा ज्याच्यावाचनू फार काम आडत नसते त्यांना नारू म्हणत. यांनाच बारा बलुतेदार आणि आठरा आलूतेदार असे सुध्दा म्हंटले जात असे.

३) ब्रिटीश सत्तेतील भटक्या जमातीची स्थिती :

इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांनी भारताच्या आर्थिक लुटीबरोबरच आपल्या उद्योग धद्याच्या माध्यमातुन त्यांनी गावगाड्यातील जातींचे रोजगार मोडीत काढले. भारतीय कलाकुसरीने तयार केलेल्या कपडयापासुन ते खेळण्यापर्यंतच्या आनेक वस्तु तत्कालीन जागतीक बाजारात या वस्तु विकल्या जात आसत आणि त्यातुन इथल्या आनेक जातींना रोजगार मिळत आसे, या तयार केलेल्या चिजवस्तुंचे वाहातुकीकरण करण्याचे काम भटक्या विमुक्त जातीतील लमान आणि इतर पोटजाती-जमाती करत आसत. ते तयार केलेला माल देशाच्या सिमेपर्यंत घेवुन जाण्याचे काम करत आसत आणि तेथुन पुढे घेवुन जाण्याचे काम त्यादेशातील वाहतुकीचे काम करणाऱ्या लोकामार्फत केले जात आसे यातुन भटक्या विमुक्त जमातींना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत आसे.

तर इतर आनेक भटक्या जमाती या आपल्या अंगच्या कलागुणांने तर कोणी शिकार करुन आपली उपजिवीका भागवत आसे, त्यात देवांच्या नावाने जगणाऱ्या आनेक जाती जमाती आहेत, तर आनेक जाती जमाती खेळ करुन गावगाड्यातील लोकांचे मनोरंजन करून आपली उपजिवीका आजही भागवत असल्याचे दिसून येतात.

१२ ऑक्टोबर १८७१ला लागू करण्यात आलेल्या गुन्हेगार जमाती कायद्याने १९८ हून अधिक जमातींच्या लक्षावधी लोकांचा बळी घेतला. जेम्स फिटझेम्स स्टिफन या ब्रिटिश अधिकाऱ्याने माणसांना जन्मजात गुलाम बनविणारा 'Criminal Tribes Act 1871' हा कायदा अस्तित्वात आणला. यापूर्वी चीफ कोर्टाने १८६० मध्ये अशाच प्रकारच्या प्रक्रियेला

गैरकायदेशीर ठरवून नाकारले होते, परंतु दुर्दैवाने मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये १२ ऑक्टोबर १८७१ ला हा कायदा लागू करण्यात आला आणि नंतर हळूहळू १८७६ पर्यंत संपूर्ण भारतभर लागू करण्यात आला. १८९७, १९११, १९२४ असा त्याचा अधिक जाचक विस्तार होत गेला. स्टिफन याने या कायद्याची रचना करताना असे म्हटले आहे की, "व्यावसायिक पद्धतीने गुन्हेगारी करणाऱ्या अशा जमाती आहेत ज्यांच्या वंशजांनी गुन्हे करण्यासाठी जातीचा वापर केलेला आहे, जे कायद्याच्या विरुद्ध आहे. अशा लोकांचं पुनर्वसन अशक्य आहे. कारण, त्यांचा धर्मच गुन्हा करणे हा आहे." पहिल्यांदा अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांची यादी करण्यात येऊन, त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली. या सर्व जमाती इंग्रजांना कर देत नसत. त्यांचे कायदे पाळत नसत. विशेष करून मीठाच्या व्यापारावरील कर देण्यास नकार दिला. याचा परिणाम कुरुची, कोरवा, लंबाडी (लमाण), येरुकुला यांच्या जगण्यावर झाला. मालवाहतुकीसाठी पुढे इंग्रजांनी रेल्वे आणली, रस्त्यांचे जाळे विणायला सुरुवात केली. यामुळे या व अशा असंख्य जमातींचे व्यवसाय बुडाले, ते अक्षरशः देशोधडीला लागले. जगण्यासाठी या जमाती छोट्या-मोठ्या चोऱ्या करत गुन्हेगारीकडे वळल्या. पुढे या जमाती इंग्रजांच्या साम्राज्याविरोधात बंड करून उभ्या राहिल्या. इंग्रजांची जंगलात वाटमारी करून लुट करीत, कत्तली केल्या जाऊ लागल्या. १८५७ च्या संस्थानिकांच्या उठावा आधीपासून रानावनातल्या या मूळच्या आदिवासी असलेल्या जमातींनी इंग्रजांना भंडावून सोडले होते. या सर्व उपद्व्यापाला त्रासून ब्रिटिशांनी या जमातींना जेरीस आणण्यासाठी एतद्देशीयांना हाताशी घेऊन 'गुन्हेगार जमाती कायदा १८७१' व 'वनकायदा १८७४' लागू करून या आदिवासी जमातींच्या मुक्त वावरावर बंधने घातली गेली. १८७१ च्या कायद्याचे तीन आधार होते- एक - एखाद्या जातीसमूह गटात जन्मलेली व्यक्ती जन्मजात गुन्हेगार बनते, कारण ती आपल्या वडिलांचाच व्यवसाय करते. एकदा-दोनदा गुन्हेगार बनलेली व्यक्ती आयुष्यभर गुन्हेगार राहते, कारण तो नियतीने ठरवून दिलेला व्यवसाय आहे व परंपरागत व्यवसाय करणे हा आपला धर्म मानतो. तीन-सतत गुन्हेगारी कृत्ये केल्याने अशी व्यक्ती सराईत गुन्हेगार बनते.

अशाप्रकारे त्यांना कठोरातील कठोर शिक्षा देण्यासाठी पोलिसांकडून मारझोड होऊ लागली. खोट्यानाट्या गुन्ह्यात अडकवले जाऊ लागले. त्यांच्या शिक्षेत वर्षानुवर्षे वाढच करण्यात आली. त्यांना तीन तारेच्या सेटलमेंटच्या कुंपणातून बाहेर पडूच दिले गेले नाही. पुनर्वसन आणि सुधारणांच्या नावाखाली जनावरांप्रमाणे राबवून घेतले गेले. नकार दिल्यास हाल हाल करून मारले जाई. लहान मुले, वयस्क म्हातारे, स्त्री पुरुष सारेच गुन्हेगार ठरवले जात. एवढेच नाही तर गर्भामध्ये वाढत असलेला गर्भाचा गोळादेखील गुन्हेगार ठरवून स्त्री-पुरुषांच्या अंगात-लिंगात लपून बसलेला जीव धरणारा रेतही गुन्हेगार ठरविण्यात आला. या कायद्याने गुन्हेगार जमाती आयुष्यातून उठल्या त्या आजतागायत जीवधरू शकल्या नाहीत. त्यांची प्रचंड निर्भर्त्सना, मानखंडना केली गेली आहे.

४) स्वातंत्र्योत्तर काळातील भटक्या जमाती :

भारतीय स्वातंत्र्यानंतर पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी हाजारो भटक्या जमातींच्या उपस्थितीत सोलापूर येथील तीन तारेचे कुंपन तोडुन ३१ ऑगस्ट १९५२ रोजी कुंपनातील गुन्हेगार ठरवल्या गेलेल्या जमातींना मुक्त केले. तेंव्हा त्या दिवसापासून भटक्या जमाती या विमुक्त या नावाने घोषीत करण्यात आल्या व इंग्रजांचा गुन्हेगार जमाती कायदा संपुष्टात आला. परंतु या कायदयांचा कलंक आजही भटक्यांच्या जमातीच्या माथ्यावरुन खऱ्या अर्थाने पुसला गेला नाही. भारतात भटक्या जमातीसाठी शासनाकडून कांही सुधारणा करण्यात आल्या आहेत, पण त्यांचे स्वरुप हे केवळ कागदोपत्रीच आसते, त्या योजना भटक्या जमातीच्या आनेक खिडक्या आसलेल्या पण दरवजाच नसलेल्या पालंपर्यंत आजही पोहचत नाहीत. ठिक-ठिकाणी अनेक गावांमध्ये वेळोवेळी भटक्या जमातीतील स्त्री-पुरुषावर प्राणघातक हल्ले होतच आहेत. भटक्या जमातीतील अनेकांकडे वास्तव्याचा कोणताही पुरावा आज सुद्धा सापडत नाही, मतदार यादीमध्ये नावच नाही तर मतदान करणार कसे आणि जो समाज मतदानापासून वंचित आहे, त्याचा विकास होणार कसा? तो मुख्य प्रवाहात येणार कसा? असे अनेक प्रश्न आजही भटक्या जमातीकडे पाहिल्यानंतर उपस्थित होत आहेत.

५) गोंधळी समाज :

महाराष्ट्रात असलेल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी माहूरची रेणुकामाता व तुळजापूरची तुळजाभवानीमाता यांना प्रसन्न करण्यासाठी ज्या समाजातील व्यक्ती वंशपरंपरेने अवगत केलेल्या कला गुणांच्या आधारे पूजा विधी करणाऱ्या व्यक्तीला 'गोंधळी' असे म्हटले जाते. पुढे काळाच्या ओघात जेव्हा व्यक्ती परंपरेने हा विधी करू लागली त्यावरून त्यांना रूढार्थाने गोंधळी असे म्हटले जाऊ लागले. गोंधळी जातीची ऐतिहासिकता ही 'गोंधळ' या कुलाचाराच्या ऐतिहासिकते इतकीच प्राचीन आहे. यावरून असे म्हणता येईल की, गोंधळी जातीचा इतिहास हा 'गोंधळ विधीच्या' इतिहासाइतका प्राचीन आहे. गोंधळी हे रेणुका मातेचे आणि तुळजाभवानीचे उपासक आहेत. आपली उत्पत्ती जमदग्नी आणि रेणुका यांच्यापासून झाली असून, माहूर हे आपले मूलस्थान आहे, अशी गोंधळ्यांची धारणा आहे.

'गोंधळ' ही रेणुकामाता आणि तुळजाभवानीमाता यांच्या उपासनेत मान्यता पावलेली ही संस्था केव्हा उगम पावली हे निश्चित करणे कठीण आहे. तुळजापूरच्या तुळजाभवानीची प्राचीनता इ. स. १००० पूर्वी मानली जाते आणि माहूरची रेणुकामातेची तर त्याहून प्राचीन आहे. रेणुकेच्या प्राचीनतेशी गोंधळ संस्थेची प्राचीनता निगडित आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयात विशेषतः यादवकालीन आद्य मराठी वाङ्मयात या संस्थेचे जे उल्लेख येतात त्यावरून असे जाणवते की, गोंधळाचा संबंध मुळात भूतमाता नावाच्या देवतेशी असावा आणि नंतर भूतमाता महाराष्ट्रातील लोकप्रिय बनलेल्या रेणुकेत समाविष्ट झाल्यामुळे गोंधळही रेणुकेच्या उपासनेत प्रविष्ट झाला असावा. वरंगळच्या गणपती काकतीयाचा गजसेनाप्रमुख जायन याने इ. स. १२४० मध्ये रचलेल्या 'नृत्यरत्नावलीत' अशी माहिती दिली आहे की, कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर तृतीय (भूलोकमल्ल) याने

आपल्या राजधानीत भूतमातृमहोत्सवाच्या प्रसंगी गोंधळाचा कार्यक्रम केला होता. भूमातृमहोत्सव हा एक अर्धलौकिक उत्सव आहे. पुराणांतून या उत्सवाची विविध वर्णने आढळतात.

बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि हा नियम भारतीय समाजतील जाती घर्माना सुध्दा अपवाद नाही, जगात झालेल्या सामाजीक राजकीय आर्थीक व भांडवली बदलाच्या प्रवाहात भारतीय समाजातील जाती धर्मामध्ये त्यांच्या राहण्याच्या, खाण्याच्या व इतर भौतिक पध्दतीत भारतीय स्वातंत्र्यानंतर अमुलाग्र असे बदल झालेले दिसून येतात. मात्र भटक्या जमाती या बदलेल्या प्रवाहापासून आजही मोठ्या प्रमाणात वंचित आहेत.

६) विषय निवडीमागील भूमिका :

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सर्व बदलांचा सशोधनात्मक अभ्यास होण्यास मागच्या 20-30 वर्षापासून गती मिळालेली दिसून येते, यात भारतातील विकसीत जाती-धर्माचा सामाजीक भौतिक, राजकीय आर्थीक विकासाचा त्यांच्यात झालेल्या बदलांचा काही प्रमाणात का होईना अभ्यास झाल्याचे दिसून येते.

भारतीत एक हजारापेक्षा जास्त भटक्या जाती-जमाती आहेत आणि त्यांचे लोकसंख्येतील प्रमाण पंधरा टक्के म्हणजेच सरासरी पंधरा कोटी पेक्षा जास्त आहे. या प्रत्येक जाती जमातीचे जगणे त्याचा इतिहास धर्म सस्कृती संघर्ष वेगळा, आहे. अशा भटक्या जमातीचा विद्यापीठीय संशोधनात्मक अभ्यासाचा विचार केला तर तो अतीशय कमी प्रमाणात झाल्याचे लक्षात येते. तर विद्यापीठीय पातळीवर जो संशोधनात्मक अभ्यास झालेला आहे त्यात वेळेच्या, काळाच्या व पैशाच्या मर्यादेतून कांही उणिवा राहिलेल्या आहेत, त्यामुळे भटक्या विमुक्तांवर नव्याने संशोधनात्मक अभ्यास होणे गरजेचे वाटते. त्यामुळे “मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००० ते २०२१)” या प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन करण्याचे संशोधकाने प्रयोजिले आहे.

७) संशोधन समस्या (Research Problem)

भारतीय स्वातंत्र्यानंतरच भारतातील लोकांच्या जिवनात अमुलाग्र अशा स्वरूपाचे बदलाचे वारे वेगाने वाहू लागले आणि या बदलामध्ये जो समाज उत्स्फुर्तपणे सहभागी झाला त्यांच्यामध्ये बऱ्याच प्रमाणात बदल झालेले दिसून येतात, त्यात दलीत समाजात झालेले बदल ठळकपणे दिसून येतात.

भारत स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना भारतात पधरा कोटीपेक्षा जास्त संख्येने असलेल्या भटक्या जमातीत हे बदल समाधानकारक प्रमाणात झालेले नाहीत, आज जग २१ व्या शतकात वावरत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये "जग एक खेडे" (ग्लोबल व्हिलेज) अशी जगाची ओळख निर्माण झालेली असताना, भारतातील भटक्या जमाती आजही बऱ्याच प्रमाणात पालावरच्या जगातच वावरताना दिसून येतात, परंतु असे असले तरीही स्वातंत्र्यानंतरच्या बदललेल्या परिस्थितीत भटक्या जमाती सुद्धा स्वतःला

सावरत आहेत, स्वतःमध्ये समाजीक,राजकीय,आर्थीक, शैक्षणिक व आशा इतर स्वरूपाचे बदल घडवून आणत आहेत. त्यामुळे भटक्या जमातीत झालेल्या या समाजीक,राजकीय,आर्थीक, शैक्षणिक बदलाचा आणि भटक्या जमातीने राज्याच्या व पर्यायाने देशाच्या राजकारणात दिलेल्या योगदानाचा अभ्यास होणे गरजेचे वाटते. त्यामुळे “मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)” या प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन करण्याचे संशोधकाने निश्चित केले आहे.

८) संशोधन विषयाचे महत्त्व :

मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)" या प्रस्तूत संशोधनामधून अनेक बाबी उलगडण्यास मदत होणार आहे.

१) प्रस्तुत सदर शोधप्रबंधात मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे, त्यामुळे या सदर माहितीचा शासनास भटक्या जमाती विषयीची ध्येय-धोरणे ठरवताना उपयुक्त ठरणार आहे, त्यामुळे सदर विषयात संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

२) प्रस्तुत सदर शोधप्रबंधात मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या विविध स्तरावरील राजकीय सहभागाचा अभ्यास करण्यात येणार आहे मराठवाड्यातील गोंधळी समाजाच्या राजकीय सहभागाची व राजकीय सहभागातील अडथळ्यांचा अभ्यास सदर शोधप्रबंधात होणार आहे त्यामुळे सदर विषयात संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

३) प्रस्तुत सदर शोधप्रबंधात मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी प्रभावित करणाऱ्या विविध घटकांचा शोध घेण्यात येणार आहे शासनास व राजकीय पक्षांना आपली ध्येय-धोरण ठरविताना सदर शोधप्रबंध उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे सदर विषयात संशोधन होणे महत्वाचे आहे.

४) प्रस्तुत सदर शोधप्रबंधात मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या राजकीय सहभागाच्या मार्गातील अडचणींचा शोध घेण्यात येणार आहे त्यामुळे मराठवाड्यातील गोंधळी समाजाच्या राजकीय उन्नतीसाठी सदर शोधप्रबंध उपयुक्त ठरणार आहे. म्हणून सदर विषयात संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

एकूण भारतीय लोकशाहीची पाळे-मुळे मराठवाड्यातील भटक्या जमातीतील समाजापर्यंत पोहचली आहेत का? सामाजीक, राजकीय आर्थिक हक्कापासून सदर समाज वंचित आहे का? किंवा समाजाची वर्तमान स्थिती काय आहे या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे सदर संशोधनातून संशोधक राज्यशास्त्रीय संशोधन पद्धतीच्या आधारे शोधून उलगडा करणार आहे, त्यामुळे सदर संशोधन हे, अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. भटक्या जमातीतील अनेक समाज घटकांना या संशोधनामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक उन्नतीसाठी व शासनस्तरावर भटक्या जमातीसाठीची ध्येय-

धोरणे ठरवण्यासाठी, राजकीय पक्षांना आपली ध्येय-धोरण ठरवताना प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे प्रस्तुत विषयावर संशोधन होणे गरजेचे व महत्त्वाचे आहे.

९) संशोधनाची व्याप्ती :

"मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)" या संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी विषयाची व्याप्ती व विषयक्षेत्र लक्षात घेता संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, नांदेड, परभणी, बीड, उस्मानाबाद, लातूर व हिंगोली आठ जिल्हयातील भटक्या जमतीतील गोंधळी समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करण्यात येणार असून, सदर आठ जिल्हयातील गोंधळी समाज वास्तव्य करीत असलेल्या प्रमुख तालुक्यातील निवडक गावांचा समावेश नमुना निवड पद्धतीने संशोधन क्षेत्रासाठी करण्यात येणार आहे.

सदर गावातील उत्तर दात्यांची निवड ही नमूना निवड पद्धतीनुसार निवडक गोंधळी समाजातील लोकप्रतिनिधी, गोंधळी समाजातील राजकिय पक्षांचे कार्यकर्ते व गोंधळी समाजातील सामान्य मतदार यांची अभ्यास करण्यासाठी निवड करण्यात येणार आहे.

१०) संशोधन विषयाची उद्दिष्टे :-

१) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या विविध स्तरावरील राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

३) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या राजकीय सहभागाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

४) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या राजकीय सहभागाच्या मार्गातील अडचणींचा शोध घेणे.

५) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

११) संशोधनाची गृहीतके :

१) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाज हा सामाजिक, राजकीय आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला आहे.

२) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजात राजकीय उदासीनता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

३) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या राजकीय सहभागाच्या मार्गात सामाजीक, राजकीय व आर्थिक अडचणी खूप मोठ्या प्रमाणात आहेत.

४) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाच्या राजकीय नेतृत्व प्राप्तीच्या महत्त्वकांक्षेला मर्यादा पडतात.

५) मराठवाड्यातील भटक्या जमातीतील गोंधळी समाजाकडे प्रगत समाज उपेक्षेच्या दृष्टीने पहातो.

१२) संशोधन पद्धती (Research Methodology) :

सामाजीक शास्त्रातील कोणतेही संशोधन हे दर्जेदार व सुसूत्रबद्ध रीतीने पूर्ण होण्यासाठी संबंधित संशोधनासाठी योग्य संशोधन पद्धतीचा अवलंब करणे खूप गरजेचे असते.

"मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)" या विषयावरील सदर प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असुन, सदर सांशोधनासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या आधारे करण्यात येणार आहे. गोंधळी समाज बहुसंख्येने वास्तव्यास असलेल्या मराठवाड्यातील गावातील स्थानिक पातळीवरील गोंधळी समाजातील लोकप्रतिनिधींच्या, राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांच्या व सामान्य मतदारांच्या मुलाखती घेऊन अनुसूची मार्फत व निरीक्षणामार्फत संशोधनकार्य करण्यात येणार आहे.

१३) तथ्य संकलन :-

"मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)" प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने तथ्य संकलनासाठी खालील पद्धतींचा व स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

१३.१) नमुना निवड पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड पद्धतीने मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील गोंधळी समाज बहुसंख्येने वास्तव्य करीत असलेल्या पन्नास गावातील गोंधळी समाजातील लोकप्रतिनिधींच्या, राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांच्या व सामान्य मतदार आशा शंभर उत्तरदात्यांच्या मुलाखती घेण्यासाठी नमुना निवड पद्धतीचा वापर करून सदर संशोधन पूर्ण करण्यात येणार आहे.

१३.२) प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य व माहिती संकलन करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत, प्रश्न अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

१३.२.१) मुलाखत :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी गोंधळी समाजातील लोकप्रतिनिधींच्या, राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांच्या व सामान्य मतदारांच्या मुलाखत घेण्यापूर्वी संशोधनास आवश्यक असा प्रश्नांचा क्रम ठरविण्यात येणार असून संशोधनासाठी आवश्यक अशा मुद्यावर उत्तरदात्यांशी सविस्तर चर्चा करण्यात येईल.

१३.२.२) प्रश्न अनुसूची :

प्रश्न अनुसूची ही संशोधन विषय व व्याप्ती लक्षात घेऊन वस्तुनिष्ठ प्रश्नाच्या स्वरुपात तयार करण्यात येणार आहे.

१३.२.३) निरीक्षण :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाकडून निरीक्षण पद्धतीचाही वापर करून संशोधनासाठी तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

१३.३) दुय्यम साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतापैकी विविध वर्तमानपत्रातील/मासिकातील लेख, आत्मचरित्र, जनगणना, शासकीय दस्तावेज व शासकीय अहवाल, विविध संघटनानी काढलेली मासिके, चर्चासत्रे, परिषदा यातील प्रकाशित-अप्रकाशीत अहवाल, संशोधक विद्यार्थ्यांनी सादर केलेले शोधप्रबंध, तसेच विविध वेब संकेतस्थळांचा वापर या सर्व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी केला जाणार आहे.

१४) तथ्यांचे विश्लेषण :

सामाजीक शास्त्रातील संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर तथ्यांचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय संकलीत केलेल्या तथ्यांचा अर्थबोध होत नाही. प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण ही संशोधनातील एक महत्त्वाची पायरी आहे, त्याशिवाय संशोधन पूर्ण होत नाही व त्यास योग्य अर्थ प्राप्त होत नाही, त्यामुळे तथ्यांच्या आधारे संकलित केलेल्या महितेचे विश्लेषण योग्य पद्धतीने करण्यात येणार आहे.

१५) प्रकरणनिहाय मांडणी :

“मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)” या प्रस्तुत संशोधन विषयाचे योग्य व वस्तुनिष्ठ सुसंगत अध्ययन व्हावे. यासाठी प्रत्येक भागाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करता यावा म्हणून संशोधन विषयाची प्रकरणानिहाय मांडणी निश्चित करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

सदर संशोधनाच्या पहिल्या प्रकरणात संशोधनाची घटकवार विभागणी करून “मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)” या प्रस्तुत संशोधन विषयाच्या विषय प्रवेशाच्या अनुषंगाने सविस्तर माहितीचे विश्लेषण करून संशोधन समस्या, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व संशोधन आराखडा इत्यादी घटकांची सविस्तर चर्चा करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती व साहित्याचे पुनरावलोकन

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील भटक्या-विमुक्त जाती-जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाच्या विविध पद्धतींचा वापर करण्यात येईल. विषयाच्या अनुषंगाने पूर्व साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : मराठवाड्यातील प्रमुख भटक्या विमुक्त जाती-जमाती

सदर संशोधनाच्या तिसऱ्या प्रकरणात "मराठवाड्यातील भटक्या जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास विशेष संदर्भ गोंधळी समाज (कालखंड २००१ ते २०२१)" या विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील प्रमुख भटक्या विमुक्त जाती-जमाती व त्यांचा राजकीय सहभाग याची सविस्तर माहिती घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : गोंधळी समाजाचा राजकीय सहभाग -

सदर संशोधन विषयाच्या चौथ्या प्रकरणामध्ये प्रस्तुत शोध विषयाच्या मुख्य विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील गोंधळी समाजातील स्त्री-पुरुषांच्या राजकीय सहभागाची घटकवार सविस्तर माहिती संकलीत करून विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे: गोंधळी समाजाच्या राजकीय विकासातील प्रमुख अडथळे

प्रस्तुत प्रकरणात गोंधळी समाजाच्या राजकीय विकासाच्या अनुषंगाने येणा-या अडथळ्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरणे सहावे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये संशोधन अभ्यास विषयामधील वरील प्रकरणांच्या विश्लेषणाच्या आधारे निष्पन्न झालेलले निष्कर्ष काढून गृहितकृत्यांची पडताळणी करून, संशोधनांती योग्य त्या महत्वपूर्ण शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भग्रंथ सूची (Bibliography):

१) आत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, माटे प्रकाशन, मुंबई १९५९

२) आत्रे त्रिंबक नारायण, गुन्हेगार जाती, आर्यभूषण छापखाना पुणे, १९११

३) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्रे, विद्याप्रकाशन नागपूर, २००२

४) गायकवाड लक्ष्मण, विमुक्त भटक्यांचे स्वातंत्र्य, साकेत प्रकाशन, २०१६

५) चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्तांची जात पंचायत, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. पुणे २००२

६) चव्हाण रामनाथ नामदेव, भटक्या विमुक्तांचे अंतरंग, सुगावा प्रकाशन पुणे, २०१३

७) ढेरे रामचंद्र चिंतामण, लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे १९९६

८) देवगांवकर एस. जी., महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती, साईनाथ प्रकाशन नागपूर, २००९

९) पवार वैशाली, महिलांच्या सत्ता संघर्षाचा आलेख, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१२

१०) बावने लीनकुमार, भटक्यांचा भग्न संसार व संस्कृती. सुधीर प्रकाशन वर्धा, २००५

११) बाधनकर व अलोनी, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, १९९९
१२) भोसले नारायण, भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत परंपरा आणि संघर्ष ४, ताईची प्रकाशन पुणे, २००८
१३) लुलेकर प्रल्हाद गोविंदराव, गावगाड्याचे शिल्पकार, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २००९
१४) लष्कर विनायक सुभाष, वडार समाज समाजशास्त्रीय अभ्यास, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, २०१५
१५) लष्कर विनायक, भोसले नारायण, पवार प्रज्ञा, विमुक्तांचे स्वातंत्र्य, परिवर्तनाचा वाटसरू प्रकाशक, पुणे, २०१८
१६) सरदार गंगाधर बाळकृष्ण, धर्म आणि समाज परिवर्तन, मागोवा प्रकाशन,पुणे,१९८२

शासकीय अहवाल :

१) इदाते आयोग, राष्ट्रीय विमुक्त भटक्या जाती जमाती आयोग, इदाते आयोगाचा अहवाल, दिल्ली २०१८
२) रेणके आयोग, भारतातील विमुक्त भटक्या जमातीचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने नेमलेला आयोग दिल्ली २००८
३) **भारतीय जनगणना अहवाल** २००१ ते २०२१
४) **जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन** २००१ ते २०२१

अप्रकाशित शोधप्रबंध :

१) कारिकंटे गणपत रामराव, मराठवाड्यातील पंचायतराज संस्थेत भटक्या विमुक्त जाती जमातीचा राजकीय सहभाग एक अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पीएच.डी. शोधप्रबंध, २०१६
२) कोनाळे संजय मारोतराव महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते प्रवाह (विशेष संदर्भ : १९९० ते २०११) या कालखंडातील अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पीएच.डी. शोधप्रबंध, २०१६
३) गायकवाड विश्वंभर 'महाराष्ट्राच्या राजकारणातील दलित नेतृत्वाच्या प्रभावाचा विवेचक अभ्यास', अप्रकाशित पीएचडो. शोधप्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २०१६.
४) पवार वसंत रामसिंग, महाराष्ट्राच्या राजकारणात बंजारा समाजाचा सहभाग : एक अभ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, २०१४,
५) वनारसे अरूण पांडूरंग, महाराष्ट्र राज्यातील चित्रकथी समाजाच्या राजकीय नेतृत्वाचे चिकित्सक अध्ययन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, २०२०

६) शिंदे नवनाथ श्रीरंग, आधुनिक समाजात गोंधळी जातीचे सामाजिक संक्रमण (जालना जिल्हासंदर्भित), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, २००८

विविध मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे

संकेत स्थळे :

१) http://en.wikipedia.org/wiki/maharashtra

२) http://en.wikipedia.org/wiki/historyofmaharashtra

३) mr.m.wikipedia.org

४) www.bbcmarsthi.com

५) www.maxmaharashtra.com

संशोधक विद्यार्थी
अंबादास नरसिंगराव पाचंगे
एम.ए. नेट (राज्यशास्त्र)
मु.पो. देवणी (बु.), ता. देवणी जि. लातूर

संशोधन मार्गदर्शक
डॉ. संजय मारोतीराव कोनाळे
सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर